पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

एकदिवसीय

# स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

## अहवाल

**दि. १० ऑक्टोबर २०१७**

प्राचार्य
डॉ. एस. आर. टकले

कार्यशाळा समन्वयक
डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
## स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा
## अहवाल
### दि. १० ऑक्टोबर २०१७

---

आजच्या स्पर्धेच्या युगात नोकरीचीसंधी फक्त स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातूनच उपलब्ध होत आहे. या स्पर्धेत ग्रामीण भागातला विद्यार्थी टिकावा व त्याला पुढे जाण्याची संधी मिळावी या संदर्भात फुलंब्री व परिसरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एकदिवशीय स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**उद्‌घाटन सत्र :-**

स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेच्या कार्यक्रमास उद्‌घाटक म्हणून प्रा. उज्जला वाखुरे (मार्गदर्शक रिलायबल अॅकडमी औरंगाबाद) हया लाभल्या होत्या. तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचर्या डॉ. एस. आर. टकले हे लाभले होते. प्रा.उज्जवला वाखुरे यांनी स्पर्धा परिक्षेत यशस्वी कसे होता येते "यशस्वी मी होणार" या विषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात असे मत व्यक्त केले की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यां मध्ये हा न्युनगंड असतोकी आपण शहरी मुलांच्या सोबत स्पर्धा परिक्षेत उतरु शकत नाही व यशस्वी होऊ शकत नाही. विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा आपल्या मनातील हन्यूनगंड दूरकेला पाहिजे. स्वतला Yes I can do असे सांगितले पाहिजे व स्वत:चा आत्मविश्वास वाढविला पाहिजे. वाखुरे मॅडमनी अनेक उदाहरणां मार्फत (यशोगाथा) कुणीही स्पर्धा परिक्षेत यश संपादन करु शकते असे सांगतले. स्पर्धा परिक्षेत यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चिती, अभ्यासाचे नियोजन, योग्य मार्गदर्शन आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी या चार गोष्टींची आवश्यकता असतात असे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. एस. आर. टकले यांनी असे मत व्यक्त केले की, महाविद्यालयात पुढील वर्षापासून स्पर्धा परिक्षा मार्गदर्शनहा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात येणार आहे. ग्राऊंड, लेखी व तोंडी परिक्षेची तयारी महाविद्यालयात करवून घेतली जाणार आहे. तरी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा.

सदरील कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. मंजुषा नळगीकर यांनी मांडले त्यात त्यांनी महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन समिती मार्फत घेतल्या जाणा-या उपक्रमा ंविषयी उपस्थितांना महिती दिली. सदरील कार्यक्रमाचे सूत्र संचलन लक्ष्मीकांत ढेपले व आभार प्रदर्शन ज्योती उदे यांनीकेले.

**सत्र पहिले :-**

पहिले सत्र हे उद्‌घाटन सत्रा नंतर लगेच घेण्यात आले. पहिल्या सत्रास प्रमुख वक्ते म्हणून श्री राहूल नावंदर (युनिक अॅकडमी औरंगाबाद) हे लाभले होते. त्यांनी एम. पी. एस. सी परिक्षा तयारी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले. एम. पी. एस.सी परिक्षेतून विद्यार्थ्यांना भावी नौकरीच्या कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत या विषयी नावंदर संरानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एम. पी. एस. सी. परिक्षेत कोणत्या पदासाठी कोणता अभ्यासक्रम आहे. अभ्यासक्रमात कोणत्या विषयाला किती गुण आहेत या विषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. अभ्यास करतांना त्याचे वेळापत्रक कसे तयार करावे व स्वयं अध्ययन कसे करावे यासंबंधी महत्त्वाच्या सूचनाकेल्या. कुठल्याही परिक्षेत यशस्वी होण्यासाठी स्वयं अध्ययन महत्त्वाचे ठरते असे त्यांनी प्रतिपादन केले.

**व्दितीय सत्र व समारोप सत्र :-**

द्वितीय सत्राचे प्रमुख वक्ते म्हणुन श्री राहुल मिसाळ (संकल्प एज्युकेशन औरंगाबाद) हे लाभले होते. तर अध्यक्ष म्हणून श्री अमोल जगदाळे (संचालक, सहयाद्री अॅकडमी फुलंब्री) हे लाभले होते. श्री मिसाळ सरांनी बॅंकींग परिक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सदरील मार्गदर्शनात त्यांनी असे मत व्यक्त केले की, बँकिंग एक असे क्षेत्र आहे की जिथे विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. अकाऊंन्टट व सी. ए ची आपल्या देशाला भरपूर गरज आहे. बॅंकींगच्या परीक्षा कोणकोणत्या पदासठी असतात. त्याचा अभ्यासक्रम आणि तयारी या विषयीचे सविस्तर मार्गदर्शन मिसाळ सरांनी विद्यार्थ्यांना दिले.

सदरील कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप करताना श्री अमोल जगदाळे यांनी असे मत व्यक्त केले की, ग्रामीण भागातील विद्यार्थी पदवीधर झाल्यावर आता पुढे काय करायचे याचा विचार करतो. परंतु शहरी विद्यार्थी अगदी आठवी पासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करतो. ग्रामीण भागातील पालक व विद्यार्थी करिअरचा तेवढा गांभीर्याने विचार करतांना दिसत नाहीत. म्हणूनग्रामीण भागातील पालक व विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परिक्षेविषयी जाणिव जागृती निर्माण करणेगरजेचे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यात बौध्दीक क्षमता व मेहनतीची तयारी असते पण केवळ योग्य मार्गदर्शना अभावी ते पुढे जात नाहीत.

सदरील कार्यशाळेचे आभार प्रदर्शन डॉ. मंजुषा नळगीरकर यांनीकेले. कार्याशाळेत प्रस्तुत महाविद्यालय व अन्य महाविद्यालयातील ८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलाहोता.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

## छायाचित्रे

## दि. १०/१०/२०१७

# उद्‌घाटन सत्र



स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्‌घाटन करतांना प्रा. उज्जला वाखुरे मॅडम



प्रा. उज्जला वाखुरे यांचे स्वागत करतांना प्रा. नळगीरकर मॅडम



कार्यशाळेचे प्रास्ताविक करतांना डॉ. मंजुषा नळगीरकर



"यशस्वी मी होणार" या विषयावर .प्रा. उज्जला वाखुरे मॅडम मार्गदर्शन करतांना



एम. पी. एस. सी परिक्षा तयारी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना श्री. राहुल नावंदर सर



अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलतांना डॉ.एस. आर .टकले सर

# समारोप सत्र







श्री  राहुल मिसाळ सर बँकींग परिक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना

अध्यक्षीय समारोप प्रसंगी  बोलतांना श्री अमोल जगदाळे सर




कार्यशाळाविषयी मनोगत सादर करतांना कु. मंगल सुरभयै





कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थ्यीं